Registered No. B. 1.

THE

Bombay Government Gazette.

Published by Authority

THURSDAY, 10TH JUNE 1897.

☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्थान सरकार.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट, आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ११ माहे मार्च सन १८९७ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

सन १८९७ चा आक्ट ८ वा.

सन १८९७ चा सन्मार्गप्रवर्तक शाळांबाबदचा आक्ट.

अनुक्रमणिका.

कलमें.

१.—प्रथमारंभींचे ठराव.

१. सरनामा, सुरुवात व व्याप्ति.

२. सन १८७६ चा ५ वा आक्ट रद्द करणें.

३. सन १८८२ च्या १० व्या आक्टाचें कलम ३९९ हें, कलम १, पोटकलम (३), याअन्वयें जाहिरनामा काढून ठरविलेल्या तारखेस रद्द होणें.

४. व्याख्या.

२.—सन्मार्गप्रवर्तक शाळा.

५. सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थापण्याचा व बंद करण्याचा अधिकार.

६. शाळांकरितां जरूर असणाऱ्या गोष्टी.

कलमें.

७. सन्मार्गप्रवर्तक शाळांची पाहणी.

८. अल्पवयी अपराध्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं फर्माविण्याचा कोर्टांस अधिकार.

९. ८ व्या कलमाअन्वयें हुकूम करण्याचा माजिस्ट्रेटास अधिकार नसेल तेव्हां काम चालविण्याची रीत.

१०. कैदेची शिक्षा दिलेल्या सोळा वर्षांखालील मुलग्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं फर्माविण्याचा माजिस्ट्रेटांस अधिकार.

कलमें.

११. अल्पवयी अपराध्याच्या वयाबाबद पूर्वचौकशी व ठराव.

१२. अशा अपराध्यांस कोणत्या सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठवावयाचें तें सरकारानें ठरविणें.

१३. जीं मनुष्यें अठरा वर्षांवर आहेत असें आढळेल त्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून न ठेवणें.

१४. सरकारच्या हुकुमानें सोडून देणें किंवा दुसऱ्या जागीं नेणें.

१५. एका प्रांतांतील अल्पवयी अपराध्यांस घेण्याकरितां दुसऱ्या प्रांतांतील सन्मार्गप्रवर्तक शाळांचा उपयोग करण्याविषयीं फर्माविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस अधिकार.

१६. कित्येक हुकूम अपिलास किंवा तपासणीस पात्र नाहींत.

३.—सन्मार्गप्रवर्तक शाळांची व्यवस्था.

१७. सुपरिंटेंडंट व व्हिजिटरांची कमिटी यांची किंवा बोर्ड आफ् म्यानेजमेंटची नेमणूक.

१८. सुपरिंटेंडंटाला मजूर चाकरीस ठेवणाराकडे अल्पवयी अपराध्यांस परवान्यानें देतां येईल.

१९. परवाना रद्द करणें.

२०. परवाना संपणें.

२१. वाईट रीतीनें वागविल्याचे प्रसंगीं परवाना रद्द करणें.

२२. सुपरिंटेंडंट हा अल्पवयी अपराध्यांचा पालनकरणारा आहे असें समजणें.

कलमें.

अल्पवयी अपराध्यास अप्रेन्टीस करण्याचा अधिकार.

२३. व्हिजिटरांच्या कमिटीचीं कामें.

२४. बोर्ड आफ् म्यानेजमेंट याचे अधिकार.

२५. शाळेच्या ट्रस्टींस किंवा इतर व्यवस्थापकांस बोर्ड आफ् म्यानेजमेंट नेमण्याचा अधिकार.

२६. बोर्डास कानू करण्याचा अधिकार.

४.—सन्मार्गप्रवर्तक शाळांच्या संबंधानें अपराध.

२७. मना केलेले जिन्नस शाळेंत आणण्याबद्दल किंवा तींतून काढण्याबद्दल किंवा देण्याबद्दल व अल्पवयी अपराध्यांबरोबर दळणवळण ठेवण्याबद्दल शिक्षा.

२८. अल्पवयी अपराध्यांस पळून जाण्यामध्यें साह्य करण्याबद्दल शिक्षा.

२९. पळून गेलेल्या अल्पवयी अपराध्यांस धरणें.

५.—किरकोळ

३०. सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांस सन १८६९ चा १९ वा आक्ट लागू करणें.

३१. मुलींसुद्धां अल्पवयी अपराध्यांची इतर रीतीनें व्यवस्था करण्याचा अधिकार.

३२. सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यावर पुनः अपराधाच्या शाबितीचा ठराव होऊन शिक्षा सांगितली असेल तेव्हां काम चालविण्याची रीत.

सन्मार्गप्रवर्तक शाळांसंबंधी कायदा सुधारणें व अल्पवयी अपराध्यांच्या व्यवस्थेसाठीं जादा ठराव करणें यांविषयीं आक्ट.

ज्याअर्थी सन्मार्गप्रवर्तक शाळांसंबंधी कायदा सुधारणें व अल्पवयी अपराध्यांच्या व्यवस्थेसाठीं जादा ठराव करणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१.—प्रथमारंभींचे ठराव.

सरनामा, सुरुवात व व्याप्ति.

१. (१) या आक्टास सन १८९७ चा सन्मार्गप्रवर्तक शाळांचा आक्ट असें ह्मणावें, आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

(३) हें कलम व कलम २ हीं सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू होतील. इतर कलमें पहिल्याप्रथम, पंजाबचे लेफ्टेनंट गव्हर्नर व कूर्गचे चीफ कमिशनर यांच्या वहिवाटींत त्या त्या वेळीं असणाऱ्या मुलुकांखेरीज सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू होतील, परंतु सदरहू दोन स्थानिक सरकारांपैकीं कोणत्याही सरकाराला, कोणत्याही वेळीं, स्थानिक सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन, हीं कलमें आपल्या मुलुकांस, अशा कोणत्याही जाहिरनाम्यांत नेमलेल्या तारखेपासून, लागू करण्याचा अधिकार आहे.

सन १८७६ चा ५ वा आक्ट रद्द करणें.

२. (१) सन १८७६ चा सन्मार्गप्रवर्तक शाळांचा आक्ट यावरून रद्द केला आहे.

(२) परंतु सदरहू आक्टाअन्वयें चालविलेलीं सर्व कामें, काढलेले सर्व हुकूम, नेमलेले किंवा अधिकार दिलेले सर्व अमलदार व केलेले सर्व कानू, अनुक्रमें, या आक्टाअन्वयें चालविलीं आहेत, काढले आहेत, नेमलेले किंवा अधिकार दिलेले आहेत व केलेले आहेत असें, शक्य असेल तेथवर, मानलें पाहिजे.

(३) कोणत्याही कायद्यांत किंवा दस्तऐवजांत सदरहू आक्टावर हवाला दिला असेल तो, शक्य असेल तेथवर, या आक्टावर किंवा त्याच्या जुळत्या भागावर दिला आहे असें समजलें पाहिजे.

सन १८८२ च्या १० व्या आक्टाचें कलम ३९९ हें, कलम १, पोटकलम (३), याअन्वयें जाहिरनामा काढून नेमलेल्या तारखेस रद्द होईल.

३. कलम १, पोटकलम (३), याअन्वयें काढलेल्या कोणत्याही जाहिरनाम्यांत ठरविलेल्या तारखेपासून, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, याचें ३९९ वें कलम, ज्या प्रांतासंबंधीं तो जाहिरनामा असेल त्या प्रांतांत रद्द होईल.

व्याख्या.

४. या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास कोणताही बाध येत नसेल तर,—

(अ) "अल्पवयी अपराधी" याचा अर्थ, ज्या कोणत्याही मुलग्यावर काळ्या पाण्यावर पाठविण्याची किंवा कैदेची शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाची शाबिती झाली असून ज्याचें वय, अशी शाबिती झाल्यावेळीं, पंधरा वर्षांच्या आंत असेल तो मुलगा, असा आहे;

(ब) "इन्स्पेक्टर-जनरल" यांत, इन्स्पेक्टर-जनरलकडे या आक्टांत सोंपलेल्या कामांपैकीं सर्व किंवा कोणतींही कामें करण्यासाठीं स्थानिक सरकारानें नेमलेल्या कोणत्याही अमलदाराचा समावेश होतो; आणि

(क) "जिल्हा माजिस्ट्रेट" यांत चीफ प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटचा समावेश होतो.

२.—सन्मार्गप्रवर्तक शाळा.

सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थापण्याचा व बंद करण्याचा अधिकार.

५. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजुरी घेऊन स्थानिक सरकारास—

(अ) त्यास योग्य वाटतील तशा जागीं सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थापतां व चालवितां येतील;

(ब) स्थानिक सरकार त्याबाबद या आक्टास अनुसरून असणारे कानू ठरवील त्यांप्रमाणें वागण्यास राजी असणाऱ्या मनुष्यांनीं चालविलेल्या शाळांचा सन्मार्गप्रवर्तक शाळांप्रमाणें उपयोग करतां येईल;

(क) सदरहूप्रमाणें स्थापलेली किंवा उपयोग केलेली कोणतीही शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळेप्रमाणें असण्याची बंद होण्याविषयीं किंवा तिचा तसा उपयोग करण्याचें बंद करण्याविषयीं फर्मावितां येईल.

शाळाकरितां जरूर असणाऱ्या गोष्टी.

६. सदरहूप्रमाणें स्थापलेल्या किंवा उपयोग केलेल्या दरेक शाळेंत—

(अ) तेथें राहणारांस रात्रीं निरनिराळें ठेवण्याचें पुरतें साधन,

(ब) तींत अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांकरितां योग्य रीतीची आरोग्यरक्षणासंबंधी व्यवस्था, पाण्याचा पुरवठा, अन्न, वस्त्रें व अंथरूणपांघरूण,

(क) अशा अल्पवयी अपराध्यांस उद्योगसंबंधी शिक्षण देण्याचें साधन,

(ड) असे अल्पवयी अपराधी आजारी असतील तेव्हां त्यांस ठेवण्याकरितां इन्फर्मरी [बीमारखाना] किंवा योग्य जागा,

हीं असलीं पाहिजेत.

सन्मार्गप्रवर्तक शाळांची पाहणी.

७. (१) जी शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळा ह्मणून स्थापण्याचा किंवा तिचा तसा उपयोग करण्याचा इरादा असेल अशा दरेक शाळेचा त्याप्रमाणें उपयोग करण्यापूर्वी, इन्स्पेक्टर-जनरलानें तिची पाहणी केली पाहिजे, आणि ६ व्या कलमावरून जरूर असल्याप्रमाणें व्यवस्था केलेली आहे, व अशा शाळेंत या आक्टाअन्वयें पाठविण्यांत येतील त्या अल्पवयी अपराध्यांस ठेवण्याकरितां ती त्याच्या मतें योग्य आहे, असें त्यास आढळेल, तर त्यानें त्याप्रमाणें दाखला दिला पाहिजे, आणि असा दाखला व ती शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळा ह्मणून स्थापण्याविषयींचा किंवा तिचा त्याप्रमाणें उपयोग करावा असें फर्मांविण्याविषयींचा स्थानिक सरकारचा हुकुम, हे, स्थानिक सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केले पाहिजेत, व त्यानंतर ती शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळा आहे असें मानलें जाईल.

(२) अशी दरेक शाळा सदरहू इन्स्पेक्टर-जनरलानें वेळोवेळीं, दरसाल निदान एकदा तरी, जाऊन पाहिली पाहिजे, व त्यानें स्थानिक सरकारास, तें स्थानिक सरकार ठरवील तशा नमुन्याप्रमाणें, त्या शाळेच्या स्थितीविषयीं रिपोर्ट पाठविला पाहिजे.

अल्पवयी अपराध्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं फर्मांविण्याचा कोर्टांस अधिकार.

८. (१) कोणत्याही अल्पवयी अपराध्यास काळ्यापाण्यावर पाठविण्याची किंवा कैदेची शिक्षा दिली असेल, व ज्या कोर्टानें त्यास शिक्षा दिली त्याच्या मतें तो सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ठेवण्यासारखा मनुष्य असेल, तेव्हां, त्या कोर्टाला, स्थानिक सरकारानें जे कोणतेही कानू केले असतील त्यांस पात्र राहून असें फर्मांविण्याचा अधिकार आहे कीं, अशा अपराध्यानें आपली शिक्षा भोगण्याच्याबदला त्यास अशा एकाद्या शाळेंत पाठवून तेथें, तीन वर्षांहून कमी नाहीं किंवा सात वर्षांहून जास्त नाहीं अशा मुदतीपर्यंत, अटकवून ठेवावा.

(२) या कलमांत सदरीलप्रमाणें कोर्टांस दिलेले अधिकार फक्त (अ) हाय कोर्टानें, (ब) सेशन कोर्टानें, (क) जिल्हा माजिस्ट्रेटानें, आणि (ड) या बाबतींत स्थानिक सरकारानें मुद्दाम अधिकार दिलेल्या कोणत्याही माजिस्ट्रेटानें चालविले पाहिजेत, व ते अशा कोर्टांस, खटला त्यांपुढें मूळचा आलेला असो किंवा अपिलांत आलेला असो, चालवितां येतील.

(३) स्थानिक सरकारास खालील बाबतींकरितां कानू करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे—

(अ) कोणत्या अल्पवयी अपराध्यांस, त्यांच्या अपराधांच्या स्वरूपाकडे किंवा इतर गोष्टींकडे लक्ष पुरवून, सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठवावें हें ठरविण्याकरितां, आणि

(ब) अल्पवयी अपराध्यांस, त्यांच्या वयाच्या किंवा इतर गोष्टींच्या मानानें, किती मुदतीपर्यंत अशा शाळांमध्यें पाठवावें तें ठरविण्याकरितां.

८ व्या कलमाअन्वयें हुकुम करण्याचा माजिस्ट्रेटास अधिकार दिलेला नसेल तेव्हां काम चालविण्याची रीत.

९. (१) गेल्या शेवटच्या कलमाअन्वयें हुकूम करण्याचा अधिकार नसणाऱ्या कोणत्याही माजिस्ट्रेटानें कोणा अल्पवयी अपराध्यावर अपराधाच्या शाबितीचा ठराव केलेला असून तो अपराधी सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ठेवण्यासारखा मनुष्य आहे असें त्याचें मत असेल, तेव्हां त्याला, शिक्षा न देतां, असें मत लेखी नमूद करून, ज्या जिल्हा माजि-

स्ट्रेटाच्या ताब्यांत तो माजिस्ट्रेट असेल त्याकडे आपण चालविलेलें काम सादर करण्याचा व त्या अल्पवयी अपराध्यास रवाना करण्याचा अधिकार आहे.

(२) ज्या माजिस्ट्रेटाकडे याप्रमाणें काम सादर केलें असेल त्याला कांहीं जास्त चौकशी करणें योग्य वाटल्यास त्यास तसें करण्याचा अधिकार आहे, आणि अशा अल्पवयी अपराध्याचा अवल इनसाफ त्याकडून झाला असता तर त्यानें त्या अल्पवयी अपराध्यास जी शिक्षा दिली असती ती शिक्षा देण्याचा, व सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याबद्दलचा किंवा इतर प्रकारचा जो हुकूम केला असता तो हुकूम करण्याचा अधिकार आहे.

कैदेची शिक्षा दिलेल्या सोळा वर्षांखालील मुलग्यास सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं फर्माविण्याचा माजिस्ट्रेटांस अधिकार.

१०. ज्या तुरुंगांत कोणत्याही अल्पवयी अपराध्यास कैदेच्या शिक्षेच्या बजावणीकरितां अटकेंत ठेविलें असेल तो तुरुंग ताब्यांत असणाऱ्या अमलदारास, असा अपराधी त्या वेळीं पंधरा वर्षांच्या वयाचा नसल्यास त्याला, असा तुरुंग ज्या जिल्हा माजिस्ट्रेटाच्या अधिकारांत असेल त्यापुढें आणण्याचा अधिकार आहे; आणि अशा माजिस्ट्रेटाला, असा अल्पवयी अपराधी सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ठेवण्यासारखा मनुष्य आहे असें दिसल्यास, त्यानें आपली अवशेष शिक्षा भोगण्याच्याबदला, त्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविण्याविषयीं आणि कलम ८.यांत ठरविलेल्या अटकावाच्या मुदतीसंबंधीं त्यांत किंवा त्याअन्वयें ज्या इयत्ता सांगितल्या आहेत त्याच इयत्तांस पात्र असणाऱ्या मुदतीपर्यंत तेथें अटकवून ठेवण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

अल्पवयी अपराध्याच्या वयाबाबद पूर्वचौकशी व ठराव.

११. (१) कोणत्याही अल्पवयी अपराध्यास कलम ८, कलम ९ किंवा कलम १० याअन्वयें सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविण्याविषयीं फर्माविण्यापूर्वी कोर्टानें किंवा माजिस्ट्रेटानें त्याच्या वयाप्रकरणीं चौकशी केली पाहिजे, आणि कांहीं पुरावा घेणें जरूर वाटल्यास तो घेऊन, त्याविषयीं आपला ठराव, त्याचें वय साधेल तितकें नक्की नमूद करून, लिहून ठेविला पाहिजे.

(२) कलम ८ खालील हुकूम करण्याचा अधिकार नसणाऱ्या दरेक माजिस्ट्रेटानें, कलम ९, पोटकलम (१), यावरून जरूर असल्याप्रमाणें, जिल्हा माजिस्ट्रेटाकडे आपण चालविलेलें काम सादर करण्यापूर्वी व अल्पवयी अपराध्यास त्याकडे रवाना करण्यापूर्वी, सदरील प्रकारची चौकशी करून ठराव लिहून ठेवला पाहिजे.

अशा अपराध्यांस कोणत्या सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठवावयाचें तें सरकारानें ठरविणें.

१२. ज्यास कोर्टानें किंवा माजिस्ट्रेटानें सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविण्याविषयीं फर्माविलें असेल अशा दरेक अल्पवयी अपराध्यास, अशा कोर्टानें किंवा माजिस्ट्रेटानें याप्रमाणें व्यवस्था लावलेल्या अल्पवयी अपराध्यांस घेण्याकरितां जी सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थानिक सरकार सामान्य किंवा विशेष हुकूम करून नेमील तिजमध्यें पाठविलें पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा अल्पवयी अपराध्याची सन्मार्गप्रवर्तक शाळेंत तावडतोब सोई होण्यासारखी नसेल, तर त्याला —

(अ) सन्मार्गप्रवर्तक शाळेंत नेतां येई तोंपर्यंत, किंवा

(ब) त्याची अवल शिक्षेची मुदत संपे तोंपर्यंत,

ह्मणजे यांपैकीं जी गोष्ट प्रथम घडेल तोंपर्यंत, एकाद्या तुरुंगाच्या जुव्हेनाइल वार्डमध्यें किंवा स्थानिक सरकार फर्मावील तशा इतर योग्य भागामध्यें अटकेंत ठेवतां येईल. त्याच्या अवल शिक्षेची मुदत प्रथम संपली, तर त्याला ती संपल्यावर सोडून दिलें पाहिजे, परंतु त्याला सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविला तर मग अगोदर भोगलेल्या कैदेची मुदत सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्यादाखल मानली पाहिजे.

जीं मनुष्यें अठरा वर्षांवर आहेत असें आढळेल त्यास सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून न ठेवणें.

१३. (१) जर एकाद्या अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविल्यानंतर कोणत्याही वेळीं, प्रसंगाप्रमाणें, व्हिझिटरांच्या कमिटीस किंवा बोर्ड आफ् म्यानेजमेंट यास असें दिसून येईल कीं, अशा अल्पवयी अपराध्याचें वय त्यास अटकवून ठेवण्याबद्दलच्या हुकुमांत कमी लिहिलेलें असून, ज्या मुदतीपर्यंत त्याला अटकवून ठेवण्याविषयीं हुकूम

झाला आहे ती मुदत संपण्यापूर्वी तो अठरा वर्षांच्या वयाचा होणार आहे, तेव्हां, तिनें किंवा त्यानें त्या प्रकरणाबाबद हुकुमाकरितां स्थानिक सरकारास रिपोर्ट केला पाहिजे.

(२) कोणताही मनुष्य अठरा वर्षांच्या वयाचा झाल्याचें स्थानिक सरकारास आढळून आल्यानंतर त्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवतां कामा नये.

सरकारच्या हुकुमानें सोडून देणें किंवा दुसऱ्या जागीं नेणें.

१४. स्थानिक सरकाराला कोणत्याही अल्पवयी अपराध्याविषयीं कोणत्याही वेळीं खालीलप्रमाणें हुकूम करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे—

(अ) त्याला सन्मार्गप्रवर्तक शाळेंतून सोडून देण्याविषयीं;

(ब) त्याला एका सन्मार्गप्रवर्तक शाळेंतून अशा सरकारच्या ताब्यांतील मुलुखांमध्यें असणाऱ्या तशा दुसऱ्या शाळेंत नेण्याविषयीं: मात्र त्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याची एकंदर मुदत सदरीलप्रमाणें दुसऱ्या शाळेंत नेल्यामुळें वाढतां कामा नये.

एका प्रांतांतील अल्पवयी अपराध्यांस घेण्याकरितां दुसऱ्या प्रांतांतील सन्मार्गप्रवर्तक शाळांचा उपयोग करण्याविषयीं फर्मांविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस अधिकार.

१५. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, एका प्रांतांत असणाऱ्या कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत, दुसऱ्या कोणत्याही प्रांतांतील कोणत्याही कोर्टानें किंवा माजिस्ट्रेटानें कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठवण्याविषयीं फर्मांविलेल्या अल्पवयी अपराध्यांस घेतां येईल असें, सामान्य किंवा विशेष हुकूम करून, फर्मांविण्याचा अधिकार आहे.

(२) तसेंच, अशा कोणत्याही हुकुमांत अशा अल्पवयी अपराध्यांस नेण्याविषयीं व त्याच्या गुजाऱ्याच्या खर्चाविषयीं ठराव करण्याचा, आणि जरूर असतील तशा कोणत्याही जास्त आज्ञा फर्मांविण्याचा अधिकार आहे.

कित्येक हुकुम अपिलास किंवा तपासणीस पात्र नाहींत.

१६. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा यांतील कोणत्याही मजकुरावरून कोणत्याही कोर्टास किंवा माजिस्ट्रेटास, अल्पवयी अपराध्याच्या वयासंबंधीं, किंवा काळ्यापाण्यावर पाठविण्याच्या किंवा कैदेच्या बदला सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याविषयींच्या हुकुमासंबंधीं केलेला कोणताही हुकूम अपिलांत किंवा तपासणींत फिरविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये.

३.—सन्मार्गप्रवर्तक शाळांची व्यवस्था.

सुपरिंटेंडंट व व्हिजिटरांची कमिटी यांची किंवा बोर्ड आफ् म्यानेजमेंटची नेमणूक.

१७. (१) दरेक सन्मार्गप्रवर्तक शाळेचा निर्बंध व व्यवस्था ठेवण्यासाठीं स्थानिक सरकारानें (अ) एक सुपरिंटेंडंट व एक व्हिजिटरांची कमिटी नेमली पाहिजे, किंवा (ब) एक बोर्ड आॅफ् म्यानेजमेंट * नेमला पाहिजे.

(२) याप्रमाणें नेमलेल्या दरेक कमिटींत व दरेक बोर्डांत निदान पांच मनुष्यें असलीं पाहिजेत, व त्यांतून निदान दोन हिंदुस्थानचीं असलीं पाहिजेत.

(३) स्थानिक सरकाराला, सदरहूप्रमाणें नेमलेल्या कोणत्याही सुपरिंटेंडंटास किंवा कमिटीच्या किंवा बोर्डाच्या कोणत्याही सभासदास सस्पेंड किंवा कामावरून दूर करतां येईल.

सुपरिंटेंडंटाला मजूर चाकरीस ठेवणारांकडे अल्पवयी अपराध्यांस परवान्यानें देतां येईल.

१८. (१) सदरहूप्रमाणें नेमलेल्या दरेक सुपरिंटेंडंटाला, सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविलेल्या ज्या कोणत्याही अल्पवयी अपराध्याचें वय चवदा वर्षांचें झालेलें असेल त्यास, आपल्या सहीच्या परवान्यानें, अशा परवान्यांत नांव लिहिलेला जो कोणताही विश्वासू व प्रतिष्ठित मनुष्य, किंवा सरकारचा किंवा म्युनिसिपालिटीचा जो कोणताही अमलदार, मजूर चाकरीस ठेवणारा असून अशा अपराध्यास घेऊन त्याचा सांभाळ करण्यास राजी असेल त्याच्या ताब्यांत राहण्याची परवानगी, सदरहू कमिटीच्या मंजुरीनिशीं, देण्याचा

* बोर्ड आफ् म्यानेजमेंट = व्यवस्थापक मंडळी.

अधिकार आहे: मात्र अशा चाकरीस ठेवणारानें, आपण अशा अल्पवयी अपराध्यास कोणत्या तरी धंद्यांत, पेशांत किंवा उद्योगांत कामास लावीन अशी शर्त करून दिली पाहिजे.

(२) सदरील परवाना तीन महिन्यांपर्यंत अमलांत राहील, त्याहून ज्यास्त वेळ राहणार नाहीं, परंतु ज्या मुदतीपर्यंत अल्पवयी अपराध्यास अटकवून ठेवण्याविषयीं फर्माविलें असेल ती मुदत संपेपर्यंत तो कोणत्याही वेळीं व वेळोवेळीं एकेका वेळेस तीन तीन महिन्यांबद्दल नवीन करून देतां येईल.

१९. सदरहू परवान्यांत नांव लिहिलेला चाकरीस ठेवणारा सांगेल तेव्हां तो परवाना रद्द केला पाहिजे. — परवाना रद्द करणें.

२०. जर परवान्याच्या मुदतींत, त्यांत ज्या चाकरीस ठेवणाराचें नांव लिहिलें असेल तो मरण पावेल, किंवा काम किंवा मजूर ठेवणें बंद करील, किंवा ज्या मुदतीपर्यंत अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याविषयीं फर्माविलें असेल ती मुदत संपेल, तर मग तो परवाना बंद होईल व संपेल. — परवाना संपणें.

२१. चाकरीस ठेवणारानें अल्पवयी अपराध्यास वाईट रीतीनें वागविलें आहे, किंवा त्याच्या राहण्याची व गुजाऱ्याची योग्य तजवीज केलेली नाहीं असें सुपरिंटेंडटास दिसेल तर त्याला परवाना रद्द करण्याचा अधिकार आहे. — वाईट रीतीनें वागविल्याचे प्रसंगीं परवाना रद्द करणें.

२२. (१) सन १८९० चा आक्ट १९ (अप्रेन्टिसांला बांधून घेण्याबाबतचा) याच्या अर्थाप्रमाणें, सन्मार्गप्रवर्तक शाळेचा सुपरिंटेंडट हा, अशा शाळेंत अटकवून ठेवलेल्या दरेक अल्पवयी अपराध्याचा पालनकरणारा आहे असें समजलें पाहिजे. — सुपरिंटेंडट हा अल्पवयी अपराध्यांचा पालनकरणारा आहे असें समजणें.

(२) १८ व्या कलमाअन्वयें परवाना दिलेला कोणताही अल्पवयी अपराधी आपल्या परवान्याच्या एका किंवा अधिक मुदतींत चांगल्या रीतीनें वागला असें सुपरिंटेंडटास दिसेल तर त्याला सदरहू आक्टाच्या ठरावांअन्वयें, सदरहू कमिटीच्या मंजुरीनें, त्यास अप्रेन्टीस करण्याचा अधिकार आहे, आणि याप्रमाणें तो अप्रेन्टीस झाल्यावर अशा अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याचा हक्क बंद होईल, आणि त्याच्या शिक्षेची कांहीं मुदत शिल्लक राहिली असल्यास ती रद्द केली पाहिजे. — अल्पवयी अपराध्यास अप्रेन्टीस करण्याचा अधिकार.

२३. (१) सन्मार्गप्रवर्तक शाळेकरितां १७ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या व्हिजिटरांच्या दरेक कमिटीनें दरेक महिन्यांत निदान एकदा,— — व्हिजिटरांच्या कमिटीचीं कामें.

(अ) तकरारी ऐकण्यासाठीं आणि ६ व्या कलमावरून जरूर असणाऱ्या गोष्टी केल्या असल्याबद्दल व शाळेची व्यवस्था सर्व प्रकारें योग्य असल्याबद्दल पाहण्यासाठीं शाळेंत गेलें पाहिजे;

(ब) शिक्षेचें बुक तपासलें पाहिजे;

(क) कोणतींही विशेष प्रकरणें असतील तीं इन्स्पेक्टर-जनरलाच्या नजरेस आणलीं पाहिजेत; आणि

(ड) कोणत्याहि मनुष्यास शाळेंत गैरकायदेशीर रीतीनें अटकवून ठेविलें नसल्याबद्दल पाहिलें पाहिजे.

(२) सदरहूप्रमाणें नेमलेल्या व्हिजिटरांच्या कमिटीच्या कोणत्याहि सभासदाकडून शाळेंत जाण्याची व वर सांगितलेलीं कामें बजावण्यामध्यें साह्य करण्याची एकसारखी सहा महिनेपर्यंत चूक किंवा हयगई होईल, तर तो अशा कमिटीचा सभासद असण्याचा बंद होईल.

२४. जर १७ व्या कलमांत दिलेला अधिकार चालवून स्थानिक सरकार कोणत्याहि सन्मार्गप्रवर्तक शाळेसाठीं बोर्ड आफ् म्यानेजमेंट नेमील, तर १८ ते २२ य पांच कलमांअन्वयें सुपरिंटेंडटाचे जे अधिकार व कामें आहेत ते अधिकार अशा — बोर्ड आफ् म्यानेजमेंट याचे अधिकार.

बोर्डास असतील व त्यानें तीं कामें केलीं पाहिजेत; आणि १८ व्या कलमांत सांगितलेला परवाना त्याच्या चेअरमनाच्या सहीचा चालेल; आणि तो बोर्ड अशा शाळेंत अटकावून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांचा पालनकरणारा आहे असें समजलें पाहिजे.

शाळेच्या ट्रस्टींस किंवा इतर व्यवस्थापकास बोर्ड आफ् म्यानेजमेंट नेमण्याचा अधिकार.

२९. स्थानिक सरकारास, शाळेची जी कोणतीही ट्रस्टींची मंडळी किंवा व्यवस्थापक, कलम ९, रकम (ब), हींत उल्लेख केलेल्या कानूंप्रमाणें वागण्यास राजी असतील, त्यांला या आक्टाखालील बोर्ड आफ् म्यानेजमेंट ह्मणून ठरवितां येईल, आणि मग अशा मंडळीस किंवा व्यवस्थापकांस अशा बोर्ड आफ् म्यानेजमेंटचे सर्व अधिकार असतील व तिनें किंवा त्यांनीं अशा बोर्डाचीं सर्व कामें केलीं पाहिजेत.

बोर्डाचा कानू करण्याचा अधिकार.

२६. (१) स्थानिक सरकारची पूर्वी मंजुरी घेऊन, सन्मार्गप्रवर्तक शाळेचा दरेक बोर्ड आफ् म्यानेजमेंट यास, खालील बाबतींविषयीं, या आक्टास अनुसरून असणारे कानू वेळोवेळीं करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे—

(१) जे जिन्नस "मना केलेले जिन्नस" ह्मणून समजावयाचे ते ठरविण्याविषयीं; आणि

(२) खालील बाबतींचें, ह्मणजे—

(अ) बोर्डाचें काम चालविणें,

(ब) शाळेची व्यवस्था,

(क) अल्पवयी अपराध्यांचा विद्याभ्यास व उद्योगसंबंधी शिक्षण,

(ड) अल्पवयी अपराध्यांस भेटणें व त्यांच्याशीं दळणवळण ठेवणें,

(ई) "मना केलेले जिन्नस" ह्मणून बोर्डानें ठरविलेले कोणतेही जिन्नस कोणत्या अटींअन्वयें व शर्तींअन्वयें शाळेंत आणतां किंवा तींतून काढतां येतील तें,

(फ) असे जिन्नस योग्य अधिकारावांचून सदरहू शाळेंत आणले असतील तेव्हां ते कोणत्या रीतीनें तींतून काढावयाचे तें,

(ग) अशा शाळेंत अटकावून ठेवण्याचा हुकूम ज्याविषयीं झाला असेल अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यास तिच्याबाहेर असे जिन्नस कोणत्या शर्तींअन्वयें व इयत्तांअन्वयें देतां येतील तें,

(ह) अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यानें असे जिन्नस कबज्यांत ठेवण्याविषयीं कोणत्या शर्तींवर मंजुरी देतां येईल तें,

(आय्) असे जिन्नस योग्य अधिकारावांचून देण्यांत किंवा कबज्यांत ठेवण्यांत येतील तेव्हां ते दिल्याबद्दल किंवा कबज्यांत ठेवल्याबद्दल करावयाच्या शिक्षा,

(ज) अल्पवयी अपराध्यांनीं केलेल्या अपराधांबद्दल शिक्षा, आणि

(के) अल्पवयी अपराध्यांस चाकरीस ठेवण्याबद्दल परवाने देणें,

यांचें नियमन करण्याविषयीं.

(२) बोर्ड आफ् म्यानेजमेंट नसेल तेव्हां स्थानिक सरकारास, पोटकलम (१) यांतील रकम (२) (अ) हिच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही रकमेंत सांगितलेल्या गोष्टींचें व तसेंच व्हिजिटरांच्या कमिटीनें आपलें काम कोणत्या रीतीनें चालवावें याचें, कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेकरितां, नियमन करण्याविषयीं या आक्टास अनुसरून असणारे कानू करण्याचा अधिकार आहे.

४.—सन्मार्गप्रवर्तक शाळांच्या संबंधानें अपराध.

मना केलेले जिन्नस शाळेंत आणण्याबद्दल किंवा तींतून काढण्याबद्दल किंवा देण्याबद्दल व अल्पवयी अपराध्यांशीं दळणवळण ठेवण्याबद्दल शिक्षा.

२७. जो कोणी २६ व्या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूविरुद्ध मना केलेला कोणताही जिन्नस, कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत आणील किंवा तींतून काढील, किंवा कोणत्याही प्रकारच्या साधनानें तींत आणण्याचा किंवा तींतून काढण्याचा प्रयत्न करील, किंवा कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याचा हुकूम ज्याविषयीं झाला असेल अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यास तिच्या हद्दीबाहेर देईल किंवा देण्याचा प्रयत्न करील तो मनुष्य,

आणि सन्मार्गप्रवर्तक शाळा स्वाधीन असणारा जो कोणी अमलदार किंवा मनुष्य, अशा कोणत्याही कानूविरुद्ध, जाणून बुजून, असा कोणताही जिन्नस कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत आणूं किंवा तींतून काढूं देईल, तींत अटकवून ठेवलेल्या कोणत्याही अल्पवयी अपराध्यास कवज्यांत ठेवूं देईल, किंवा तिच्या हद्दीबाहेर अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यास देऊं देईल, तो दरेक अमलदार किंवा मनुष्य,

आणि जो कोणी, अशा कोणत्याही कानूविरुद्ध, अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्याशीं दळणवळण ठेवील किंवा ठेवण्याचा प्रयत्न करील तो मनुष्य,

आणि जो कोणी या कलमाअन्वयें शिक्षा करण्याजोगा कोणताही अपराध करण्यांत साह्य करील तो मनुष्य,

माजिस्ट्रेटापुढें अपराधाची शाबिती झाल्यावर, सहा महिन्यांहून जास्त नसणाऱ्या मुदतीच्या कैदेस, किंवा दोनशें रुपयांहून जास्त नसणाऱ्या दंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

अल्पवयी अपराध्यांस पळून जाण्यामध्यें साह्य करण्याबद्दल शिक्षा.

२८. जो कोणी, अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंतून, किंवा अशा अल्पवयी अपराध्यास चाकरीस ठेवणाराकडून पळून जाण्यामध्यें किंवा पळून जाण्याच्या प्रयत्नामध्यें साह्य करील, त्यास पराकाष्ठा सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेची किंवा पराकाष्ठा दोनशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा करतां येईल, किंवा या दोन्ही शिक्षा करतां येतील.

पळून गेलेल्या अल्पवयी अपराध्यास धरणें.

२९. पोलीस अमलदाराला, या आक्टाअन्वयें सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविलेला जो कोणताही अल्पवयी अपराधी अशा शाळेंतून किंवा त्यास चाकरीस ठेवणाराकडून पळून गेला असेल त्यास, माजिस्ट्रेटाच्या हुकुमावांचून, व वारंटावांचून, धरण्याचा व अशा शाळेंत किंवा चाकरीस ठेवणाराकडे परत नेण्याचा अधिकार आहे.

५.—किरकोळ.

सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांस सन १८६९ चा १५ वा आक्ट लागू करणें.

३०. सन १८६९ चा कैद्यांच्या साक्षीचा आक्ट याचे ठराव लागू करतां येतील तेथवर ते, सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांस, ते अपराधी त्या आक्टाच्या अर्थानुसारें, तुरुंगांत अटकेंत ठेवलेले मनुष्य असल्याप्रमाणें लागू केले पाहिजेत.

मुलांसुद्धा अल्पवयी अपराध्यांची इतर रीतीनें व्यवस्था करण्याचा अधिकार.

३१. या आक्टांत किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यांत कोणताही मजकूर असला तथापि कोणत्याही कोर्टाला, त्यास योग्य वाटेल तर, कोणत्याही अल्पवयी अपराध्यास काळ्या पाण्यावर पाठविण्याची किंवा कैदेची शिक्षा देण्याच्याबदला किंवा सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याविषयीं फर्माविण्याच्याबदला—

(अ) योग्य ताकीद देऊन सोडून देण्याविषयीं, किंवा

(ब) त्याचा बाप किंवा आई किंवा पालनकरणारा किंवा अगदीं जवळचा जाणता नातलग यानें, बारा महिन्यांहून जास्त नसणाऱ्या कोणत्याही मुदतीपर्यंत त्या अल्पवयी अपराध्याच्या चांगल्या वर्तणुकी-

बद्दल जबाबदार असण्यासाठीं, कोर्ट मागेल त्याप्रमाणें, जामिना-
निशीं किंवा जामिनावांचून मुचलका लिहून दिल्यावर, असा
बाप किंवा आई किंवा पालनकरणारा किंवा अगदीं जवळचा
जाणता नातलग याच्या स्वाधीन करण्याविषयीं,

हुकूम करतां येईल.

(२) या कलमाच्या कारणांकरितां "अल्पवयी अपराधी" या संज्ञेंत मुलगीचा समावेश होतो.

(३) या कलमांत कोर्टास जे अधिकार दिले आहेत ते फक्त ८ व्या कलमांत किंवा त्या कलमाअन्वयें अधिकार दिलेल्या कोर्टांनींच चालविले पाहिजेत.

(४) या कलमाअन्वयें काम चालविण्याचा अधिकार नसणाऱ्या कोर्टानें कोणत्याही अल्पवयी अपराध्यावर अपराधाच्या शाबितीचा ठराव केलेला असून, या कलमांत दिलेले अधिकार अशा अल्पवयी अपराध्याच्या संबंधानें चालवावे असें त्या कोर्टाचें मत असेल, तेव्हां त्याला, असें मत लिहून ठेवून, ज्या जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांत तें कोर्ट असेल त्याकडे आपण चालविलेलें काम सादर करण्याचा व त्या अल्पवयी अपराध्यास रवाना करण्याचा अधिकार आहे.

(५) ज्या जिल्हा माजिस्ट्रेटाकडे याप्रमाणें काम सादर केलें असेल त्याला मग, त्या प्रकरणाचा इनसाफ मूळचाच त्यानें केला असता तर त्यानें जसा हुकूम केला असता किंवा जशी शिक्षा दिली असती तसा हुकूम करण्याचा किंवा तशी शिक्षा देण्याचा अधिकार आहे.

सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकेंत असलेल्या अल्पवयी अपराध्यावर पुनः अपराधाच्या शाबितीचा ठराव होऊन शिक्षा दिली असेल तेव्हां काम चालविण्याची रीत.

३२. जेव्हां एकादा अल्पवयी अपराधी सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकेंत असतांना त्यावर एकाद्या फौजदारी कोर्टानें अपराधाच्या शाबितीचा ठराव केला असेल तेव्हां, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, कलम ३९७, यांत उलट कोणताही मजकूर असला तथापि, अशा कोर्टाची शिक्षा एकदम सुरू होईल; परंतु त्या कोर्टानें त्या गोष्टीबाबद स्थानिक सरकारास लगेच रिपोर्ट केला पाहिजे, व त्या सरकारास आपणास योग्य वाटेल तशा कोणत्याही रीतीनें त्या गोष्टीची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे.

जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.